## रे. मु. नं.९०/२०१५ मधील निशाणी क्रमांक ५ वरील आदेश

१. प्रस्तुतचा अर्ज वादी यांनी दिवाणी प्रक्रिया संहिता, १९०८ च्या आदेश ३९ नियम १ व २ अन्वये प्रतिवादींनी तूर्तातूर्त मनाई हुकुम मिळण्याकरीता दाखल केला आहे.

२. वादी यांच्या दाव्याचे व नि.क्र.५ च्या अर्जाचे अवलोकन केले. दाव्यातील व अर्जातील कथनांच्या अनुषंगाने असे आढळुन येते की, जिल्हा नाशिक, पोटतुकडी तालुका इगतपुरी पैकी मौजे तळेगांव या गावाचे शिवातील शेतजमीन मिळकती —

| अ.नं. | गट क्रमांक | क्षेत्र | आकार |
|---|---|---|---|
| | | हे.आर | रु.पैसे |
| १) | १२७ | ०.१०.१ | ०.६३ |
| २) | ४०५ | ०.८६ | २.६९ |

या दावा मिळकती आहेत.

३. दावा मिळकती हया वादी यांच्या प्रत्यक्ष कब्जातील, वहिवाटीतील मालकीच्या शेतजमीनी आहेत. दाव्यातील शेत जमीनी हया कै. किसन रामचंद्र चौधरी यांच्या मृत्युनंतर त्यांचे वारस/वादी यांचे नावे कायदेशीर लागलेली आहेत व त्याप्रमाणे ७/१२ उता—याला व खाते उता—याला नोंदी झालेल्या आहेत प्रतिवादी हे वादींचे सख्खे भाउबंद आहेत. परंतु वादींच्या हिश्श्याशी त्यांचा कुठलाही हित संबंध नव्हता व आजही नाही. कै. किसन रामचंद्र जगताप हे वादी कं.१ हिचे पती व वादी कं.२ व ३ चे वडील होते.

४. दाव्यातील शेत जमिनीच्या मुळ पुरुष कै. रामचंद्र चौधरी हे मयत झाल्यानंतर त्यांचे वारस — मुले

१) मुरलीधर रामचंद्र चौधरी (मुलगा—मयत)

२) किसन रामचंद्र चौधरी (मुलगा—मयत)

३) श्रीधर रामचंद्र चौधरी (मुलगा—मयत)

४) राणी रामचंद्र चौधरी (पत्नी—मसत)

असे वारस होते. हया पैकी वादींचे वडील व पत्नी कै. किसन रामचंद्र चौधरी हे वडिल व पती आहेत. त्यानुसार किसन रामचंद्र चौधरी हे मयत झाल्यानंतर त्यांचे कायदेशीर वारस सदरी वादी यांची कायदेशीर नोंद झालेली आहे. सदर मिळकती मध्ये पुर्वी पासुन अदयाप पावेतो वादी हेच पिके घेतात व सदरच्या मिळकतींचा कब्जात देखील वादींचा आहेत व रेकॉर्ड ऑफ राईट्ला वादींची नावे लागली आहेत.

५. गट क्रं.१२७ मधे संपुर्ण क्षेत्रात वादी पिके घेत आहेत. तसेच गट क्रं.४०५ मधील एकुण क्षेत्रापैकी क्षेत्र हे ०.२९ आर मध्ये वादी हेच पिके घेत आहेत. दाव्यातील गट क्रमांकांना प्रतिवादी व इतर नावे हे पोकळीस्त लागलेली आहेत. त्यांचा सदर गटाशी काही एक हित संबंध नाही व गट क्रं. ४०५ मध्ये वादी यांचा फकत ०.२९ आर क्षेत्राशी संबंध आहे व इतर क्षेत्र हे प्रतिवादी यांचे व इतरांचे आहेत व वादीचा हिश्श्याच्या क्षेत्राच्या नोंदी खाते उता—याला नोंद झालेली आहे.

६. प्रतिवादी नं.१ व २ यांचे दावा मिळकतीत पोकळीस्त नाव असल्याचा गैरफायदा घेउन प्रतिवादी दावा मिळकती या विक्री करु शकतात तसे प्रयत्न देखील प्रतिवादीचे चालु असल्याची बाब वादीस समजली आहे. त्याकरिता वादीने सदरचा अर्ज मे. न्यायालयात दाखल केला आहे. सदर दाव्याचा अंतिम निकाल लागेपावेतो दावा मिळकती या प्रतिवादींनी कोणासही गहाण, दान, विक्री वा हस्तांतर करु नये दावा मिळकतीचे मुळ स्वरुपात बदल करु नये असा तुर्तातुर्त मनाई हुकूम प्रतिवादी विरुद्ध व वादीचे लाभात देणेत यावा.

७. प्रतिवादी हे न्यायालयासमोर हजर झाले. प्रतिवादींनी त्यांचे म्हणणे नि.क्रं.१३ अन्वये दाखल केले. वादीचा दावा व नि.क्रं.५ मनाई अर्ज व

त्यातील मजकुर व मागण्या हया ख—या नाहीत, कायदेशीर नाहीत, प्रामाणिकपणाच्या नाहीत व त्या प्रतिवादींना मान्य व कबुल नाहीत.

८. दावा मिळकती हया वादी व प्रतिवादी यांचे वडिलोपार्जित मालकीच्या होत्या. प्रतिवादी यांचे मुळ पुरुष मुरलीधर रामचंद्र चौधरी तसेच वादी यांचे मुळ पुरुष श्रीधर रामचंद्र चौधरी व किसन रामचंद्र चौधरी यांचेत दाव्यात नमुद केलेल्या मिळकती व इतर तळेगांव बुा येथील सर्व मिळकती यामधे त्यांचे हयातीतच सरस निरस मानाने वाटप झालेले आहे.

९. त्याप्रमाणे वादी व प्रतिवादी यांना घरे व इतर मिळकती मिळालेल्या आहेत. यापैकी वादी यांनी त्यांचे हिश्श्यास आलेल्या काही मिळकतींची परस्पर विक्री केलेली आहे. एकत्र कुटूंबाच्या सर्व संपत्तीचे रितसर वाटप झालेले आहे. वादी व प्रतिवादी हे विभक्त रहात असुन ते आता एकत्रित कुटूंब राहिलेले नाही.

१०. त्या वाटपाप्रमाणे शेतजमीन मिळकतीपैकी गट नं.२५२ ही मिळकत किसन रामचंद्र चौधरी यांना श्रीधर रामचंद्र चौधरी, एकनाथ मुरलीधर चौधरी, कुंडलिक मुरलीधर चौधरी, सखुबाई मुरलीधर चौधरी, हिराबाई नंदु शिंदे, पंढरीनाथ मुरलीधर चौधरी यांनी किसन रामचंद्र चौधरी यांनी दि.१०.०१.१९९१ रोजी मे. तहसिलदार यांचे समक्ष रितसर प्रतिज्ञापत्र करुन दिले. त्यानंतर किसन रामचंद्र चौधरी यांनी त्याप्रमाणे गट नं.२५२ या मिळकतीस त्यांची नावे लावुन घेतलेली आहेत. त्याप्रमाणे फेरफार नोंद नं.१६३४ अन्वये इतर सहमालकांची नावे कमी होउन त्यांची नावे दाखल झालेली आहेत. अशाप्रकारे वादी यांना त्यांचा हिस्सा मिळालेला आहे.

११. श्रीधर रामचंद्र चौधरी व किसन रामचंद्र चौधरी यांनी दि.१०.०१.१९९१ रोजी मौजे तळेगांव येथील गट नं.१२७, ४०५, ४ या मिळकतीमध्ये मुरलीधर रामचंद्र चौधरी यांचे वारसांनी म्हणजेच प्रतिवादी यांचे लाभांत प्रतिज्ञापत्र मे. तहसिलदार सो, इगतपुरी यांचेसमक्ष लिहुन दिले आहे.

१२. तसेच मे. कोर्टात प्रस्तुत वादी व इतर सहमालक यांचेविरुद्ध रे. मु.नं.१०१/२०१५ दाखल केलेला आहे. प्रतिवादी दावा दाखल करणार याची माहिती झाल्यावर पोलीस स्टेशनमध्ये समजुतीचा खोटा प्रयत्न वादींनी केला आणि सदरचा दावा खोटे कथन करुन दाखल केलेला आहे. वादीने प्रतिवादीच्या कब्जाच्या मिळकतीत कब्जा व हक्क उपस्थित करण्यासाठी खोटा दावा दाखल करुन प्रतिवादीचे विरुद्ध आदेश मिळविण्याच्या प्रयत्नात वादी आहेत. त्यामुळे प्रतिवादीचे कधीही भरुन न येणारे असे नुकसार होईल. तसेच प्रतिवादीचे हिश्श्यास व कब्जात आलेली दावा मिळकत यामध्ये वादी यांनी हरकत केल्यास प्रतिवादीचे अतोनात नुकसान होईल.

१३. वरील वाद कथनांतून हे न्यायालय खालील मुद्दे विचारार्थ घेत असून त्यावरील कारणमिमांसेसह निष्कर्ष खालीलप्रमाणे आहेत.

| *मुददे* | *उत्तरे* |
|---|---|
| १ वादी यांनी त्यांचे प्रकरण सकृतदर्शनी सिद्ध केले आहे काय ? | अंशत:होकारार्थी |
| २ न्यायाचा समतोल वादींच्या बाजूने असल्याचे सिद्ध झाले इआहे काय ? | अंशत:होकारार्थी |
| ३ प्रस्तुतचा अर्ज मंजूर केल्यास कोणाचे जास्त नुकसान होण्याचा संभव आहे ? | अंशत:होकारार्थी |
| ४ आदेश काय ? | निशाणी ५ चा अर्ज अंशत: मंजूर करण्यात येत आहे. |

## कारणमिमांसा

### मुद्दा क. १ ते ३ बाबत :—

१४. वादीचे नियुक्त वकील श्री. सहाणे यांनी असा युक्तिवाद केला की, दावा मिळकत वादींच्या नावे पुर्वीपासुन आहे. परंतु दि.१०.०१.१९९१

रोजीच्या प्रतिज्ञापत्राचा आधार घेउन प्रतिवादी महसुल दस्तऐवजांमधे बदल करु इच्छितात व वादीचे कब्जास हरकत अडथळा उत्पन्न करीत आहे. दावा मिळकतीच्या सदर प्रतिज्ञापत्राचा बेकायदेशीर फायदा घेउन प्रतिवादी ति—हाईत इसमाचे नावे दावा मिळकत विक्री करु शकतात. त्यामुळे प्रतिवादींचे विरोधात मनाई हुकूमाची आवश्यकता आहे.

१५. प्रतिवादींचे नियुक्त वकील श्री.खंडेलवाल यांनी असा युक्तिवाद केला की, दावा मिळकत कधीही वादींच्या नावे १९९१ सालापासुन महसुल दप्तरी नाही. ती प्रतिवादींच्या नावे आहे. वादींनी दाखल केलेले महसुल दस्त सदर परिस्थिती स्पष्ट करतात. प्रतिज्ञापत्राच्या आधारे प्रतिवादी दावा मिळकतीचे मालक आहेत. त्यामुळे मनाई हुकूम दिल्यास तो मालकाचे विरोधात होउ शकतो. या कारणास्तव वादीचा अर्ज फेटाळण्यात यावा.

१६. दाखल दस्तऐवज पहाता दावा मिळकतीच्या ७/१२ उता—या सदरी व इतर महसुल दप्तरी वादी व प्रतिवादींच्या नावाची नोंद आहे, ही बाब दोन्ही पक्षकारांना मान्य आहे. महसुल कार्यालयामार्फत विवीध वेळेस वेगवेगळे आदेश फेरफार नोंद क्रं.९४१, १८७५, २०९१, ३७३० व १८९७ अन्वये विवीध वेळेस पारीत करण्यात आलेले आहे. यामुळे महसुल दस्तऐवज हे सुस्पष्ट नाही.

१७. वादीने नि.क्रं.३ समवेत दाखल केलेला खाते उतारा पहाता दावा मिळकत किसन रामचंद्र चौधरी याच्या नावे दर्शविली आहे. प्रतिवादी यांनी नि.क्रं.१८/२ समवेत दाखल केलेले प्रतिज्ञापत्र पहाता किसन चौधरी यांनी श्रीधर रामचंद्र चौधरी म्हणजेच वादीचे पुर्वज यांनी दावा मिळकत त्यांच्या कब्जात नाही व त्या एकनाथ मुरलीधर यांच्या वारसांच्या कब्जात आहे असे प्रतिज्ञापत्र दिल्याचे दिसुन येते. तसेच महसुल दप्तरी किसन चौधरी यांनी प्रतिवादींच्या पुर्वजांची व वारसांची नावे दावा मिळकतीबाबत व्हावी असे अर्ज दिल्याचे दिसुन येते.

१८. उपरोक्त परिच्छेदात नमुद केल्याप्रमाणे वादीच्या पुर्वजांनी किसन याने प्रतिज्ञापत्राव्दारे दावा मिळकतीवरुन स्वतःची नावे कमी करावी असे दिलेले आहे. परंतु महसुल दस्तऐवजांमधे विशेषतः खातेउता—यात अजुनही वादींच्या पुर्वजांची नोंद आहे. याचा अर्थ दि.१०.०१.१९९१ रोजीचे प्रतिज्ञापत्र हे महसुल दस्तऐवजाशी मिळते जुळते नाही.

१९. सादर महसुल दस्तऐवज हे एकमेकांशी सुसंगत नाही. त्याचप्रमाणे दि.१०.०१.१९९१ रोजीचे प्रतिज्ञापत्र हे महसुल दस्तऐवजांशी मिळतेजुळते नाही. तसेच दावा मिळकतीवर वादींचा कब्जा आहे असेही सुस्पष्ट होत नाही. त्यामुळे वादी विनासायास त्याचे कथन प्रथमदर्शनी अंशतः सिद्ध करु शकलेला आहे. तसेच न्यायाचा समतोल वादीचे पक्षात अंशतः आहे. या निष्कर्षासह मुद्दा कं.१ व २ चे उत्तर अंशतः होकारार्थी देण्यात येतात.

२०. वादीने मनाई हुकूमाव्दारे अशी मागणी केलेली आहे की, दावा विचाराधीन असतांना दावा मिळकतीची विक्री प्रतिवादीने ति—हाईत इसमाचे पक्षात करु नये. त्याचप्रमाणे त्याने परिच्छेद कं.५ मधे त्याचा दावा मिळकतीवरील कब्जा अबाधीत रहावा अशी विनंती केली आहे. दावा मिळकतीवर वादी यांचा कब्जा आहे असे स्पष्ट झालेले नाही. त्यामुळे कब्जाबाबत वादींना मनाई हुकूम देता येणार नाही. या कारणास्तव मुद्दा कं.३ चे उत्तर अंशतः होकारार्थी देण्यात येते.

**<u>मुददा क. ४</u> :—**

२१. मुद्दा क. १ ते ३ च्या अंशतः होकारार्थी उत्तरांच्या अनुषंगाने हे न्यायालय खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

## आदेश

१. निशाणी ५ चा अर्ज अंशतः मंजूर करण्यात येत आहे.

२. पुढील आदेश होईपर्यंत प्रतिवादी यांनी दावा मिळकतीची विक्री अथवा हस्तांतरण ति—हाईत इसमाचे पक्षात होउ नये.

३. प्रस्तुतच्या अर्जाचा खर्च हा दाव्याच्या खर्चाच्या वेळेस विचाराधीन राहील.

दिनांक ३०.०७.२०१५
इगतपुरी.

(स्व. ना. ढोलम)
दिवाणी न्यायाधिश, (क.स्तर)
इगतपुरी.